**<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. ३२/२०१८ मधील नि. ३० वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे तर्फे या दाव्यामध्ये कैफियत व निशाण ५ म्हणजे तुर्तातुर्त ताकिद अर्ज याच्यावर दिलेले म्हणण्यामध्ये झालेल्या तांत्रिक चुकीबाबत दुरुस्त करण्यासाठी सादर केलेला आहे. सदर कैफियतमधील परिच्छेद क्र. १ मधील ओळ क्र. २ मध्ये वाक्याचे शेवटी 'आहे' या शब्दा ऐवजी 'नाही' असा शब्द नमूद झाल्यामुळे सदर 'नाही' शब्दाच्या जागी 'आहे' अशी दुरुस्ती करण्याची परवानगी या अर्जाअन्वये करण्यात आली आहे.

२. या अर्जास वादीतर्फे निशाण नं. ३१ येथे आपले म्हणणे सादर केलेले असून त्याने अर्जाचे खंडण केले आहे. त्याच्या मते प्रतिवादींनी त्यांचे कैफियतीमधील परिच्छेद क्र. १ मध्ये जी काही कबुली दिली आहे ती अनन्य साधारण महत्वाची आहे. त्या कबुलीच्या आधारे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चा नियमक्रम १२ नियम ६, उपनियम १ अन्वये वादीचा दावा मंजुर केला जावु शकतो. तशी महत्वपुर्ण कबुली मागे घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला असुन तसा अधिकार प्रतिवादींना नाही. प्रतिवादींनी प्रार्थित केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही पुर्णता बेकायदेशीर आहे. प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमधील परिच्छेद क्र. २ मध्ये वादीच्या दाव्याच्या परिच्छेद क्र. २ मधील मजकुर नाकारलेला आहे. म्हणजे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीचे पुर्वाधिकारी सिताराम बटवलकर व राधाकृष्ण बटवलकर यांचा दावा जमिनीतील कायम कुळहक्क नाकारलेला आहे. अशा संदर्भात पक्षकथित करण्याचा त्यांना कोणताही अधिकार नसल्याचे वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी त्यांचा गमावलेला अधिकार पुन्हा मिळण्यासाठी पश्चात बुध्दीने कैफियतीच्या परिच्छेद क्र. २ मध्ये दुरुस्ती मागतलेली आहे. त्यामुळे मागितलेली दुरुस्ती फेटाळण्यात यावी अशी मागणी वादीने केली आहे.

३. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादींनी सादर केलेल्या कैफियतीचे तथा तुर्तातुर्त ताकिद अर्जावर दिलेले म्हणण्याचे अवलोकन केले. सदर कैफियत व म्हणणे निशाण १४ येथे दाखल केलेले आहे. सदर म्हणण्यातील परिच्छेद क्र. १ ते १० पाहिले असता प्रतिवादी यांनी वादीच्या वादपत्रातील संबंधीत परिच्छेदमध्ये काही ठिकाणी कबुल केले आहे तर काही ठिकाणी नाकबुल केलेले आहे. अशा रितीने प्रतिवादीने वादीच्या वादपत्रातील तथ्य विशीष्ट पध्दतीने मान्य केले आहे आणि नाकारलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये परिच्छेद क्र. १ मध्ये मोघमरित्या वादीच्या दाव्याबाबतच्या निशाण

५ वरील अर्जाबाबत उल्लेख केलेला आहे. सदरचे वाक्य खालीलप्रमाणे आहे. 'वादीच्या सदरच्या दाव्यातील मजकुर व निशाण नं. ५ मधील मजकुर खरा व सद्‌भावनेचा नसुन प्रतिवादींना मान्य व कबुल आहे'. प्रस्तुत अर्ज या वाक्यातील शेवटच्या शब्दासाठी दाखल केला आहे. वादीचा विधीज्ञ वकिलांनी जो काही युक्तीवाद केलेला आहे त्यावरुन प्रतिवादींनी वादीच्या संपुर्ण दाव्याला कबुली दिलेली आहे असे त्या वाक्यावरुन स्पष्टपणे प्रतित होत नाही. त्या वाक्यामध्ये मजकुर सद्‌भावनेचा नाही असे स्पष्टपणे नमुद आहे. त्यामुळे असा शब्द नमुद आहे म्हणजे नकारार्थी भावनेनंतर सकारात्मक भावना येणे अप्रत्यक्ष नाही. याचे दुसरे कारण म्हणजे प्रतिवादींच्या कैफियतीमध्ये उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे त्यांना काय कबुल आहे व काय कबुल नाही याचा स्पष्ट उल्लेख आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी तर्फे सदर कैफियतीमधील झालेल्या दोषाला अत्यंत तांत्रिक स्वरुप देण्याचा प्रयत्न झाल्याचे मला दिसते. प्रस्तुत दाव्यामध्ये सद्या तुर्तातुर्त ताकिद अर्जावर सुनावणी चालु आहे. त्यामुळे वादकथनामध्ये दुरुस्ती करायची झाल्यास तशी संमत्ती पक्षकारांना देणे न्यायाचे कारणास्तव हिताचे राहाणार आहे. सदर वाक्यामधून असे प्रतित होत नाही की प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे नियमक्रम १२ नियम ६ उपनियम १ अन्वये दाव्याबाबत कबुली दिलेली आहे. त्याचप्रमाणे हे देखील महत्वाचे आहे की प्रतिवादीच्या कैफियतीचा सारासार विचार केला असता वादीने उभारलेल्या दाव्याबाबत हरकत घेतलेली आहे आणि स्वत:ची एक बाजु मांडलेली आहे. त्यामुळे कैफियतीतील एका वाक्याचा अर्थ धरुन प्रतिवादींना संपुर्ण दावा मान्य आहे असे मत मांडता येणार नाही. सबब प्रतिवादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील आदेश पारित करतो.

१. प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने त्याबाबतची दुरुस्ती कैफियतीमध्ये करावी. दुरुस्त कैफियतीची प्रत या दाव्याचे कामी सादर करावी.

सही/—

(विनायक द. पाटील)

दिनांक :—२१/०८/२०१८ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.